संं.फौ.ख.क्र.१८४/२०२०
अंकुश वि. अशोक
**निशाणी क्र.११४**

**<u>आरोपीतर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी शपथेवर सुरू</u> –**

| | | |
|---|---|---|
| नाव | - | बाळु अंबादास उक्कलकर, |
| वय | - | ४० वर्षे, |
| व्यवसाय | - | शेती, |
| राहणार | - | उक्कलगाव, ता. मानवत, जि. परभणी. |

**<u>आरोपीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास त्यांचे विधीज्ञ श्री. एल. व्ही. कुलकर्णी यांचेमार्फत शपथेवर सुरु</u> –**

मी फिर्यादी व आरोपी यांना ओळखतो. त्या दोघांचे भागीदारीमध्ये गीताजंली बार या नावाने हॉटेल होते. तिथे मी मॅनेजर म्हणून कामाला होतो. फिर्यादी सदर हॉटेलमधील दारुचा व्यवहार पाहत होते, तर आरोपी हे हॉटेलमधील भाजीपाल्याचा व्यवहार पाहत होते. आरोपी हे भाजीपाल्याचा व्यवहार करत असताना कधी नगदी, तर कधी चेकद्वारे व्यवहार करायचे. आरोपी यांचे चेकबुक हॉटेलच्या काउंटरमध्ये ठेवलेले असायचे. आरोपी हे त्यांचे चेक सही करुन काउंटरमध्ये ठेवत असायचे. पैसे नसल्यास चेकद्वारे अदा करण्यास सांगायचे. आरोपी नसल्यास व्यवहाराकरिता आरोपीचे चेक फिर्यादी कधीही वापरत असायचे.

**<u>सरतपास पूर्ण</u>.**

**<u>तक्रारदारातर्फे दिलेल्या नि.११५ वरील अर्जानुसार साक्षीदाराचा उलटतपास पूढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.</u>**

श्रृ. नि. स्वि.,

स्वाक्षरीत/–

**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
मानवत.

मानवत.
दिनांक: ३०/०७/२०२६.